सत्यमेव जयते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६०० / २६३३३३३० /२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

जा.क्र/बार्टी-पुणे/BANRF अधिछात्रवृत्ती जाहिरात/२०२६-२०२७/५७५८ दिनांक-१५/०९/२०२६

# पीएच.डी अधिछात्रवृत्ती (शैक्षणिक वर्ष २०२३,२०२४ व २०२५ करिता ) दुसरी मुदतवाढ बाबत घोषणापत्रक

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत अनुसूचित जातीतील संशोधक विद्यार्थ्यांकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) योजना राबविली जाते. सदर योजनेच्या अंमलबजावणीकरिता महाराष्ट्र शासनाने सर्वंकष धोरण निश्चित केले आहे. त्यानुसार बार्टी, पुणे संस्थेमार्फत **दिनांक १ जानेवारी २०२३ ते दिनांक ३१ डिसेंबर २०२५** या कालावधीत पीएच.डी करीता कायम नोंदणी असणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकडून पीएच.डी अधिछात्रवृत्ती वर्ष २०२३, २०२४ व २०२५ करीता दिनांक ०१/०८/२०२६ पासून दिनांक ३१/०८/२०२६ पर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात आले होते. तथापि दिनांक २७/०८/२०२६ च्या घोषणापत्रकानुसार दिनांक १५/०९/२०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी प्रथम मुदतवाढ देण्यात आली आहे.

तथापि सदर घोषणापत्रकाद्वारे पीएच.डी अधिछात्रवृत्ती वर्ष २०२३, २०२४ व २०२५ करीता **दिनांक १ जानेवारी २०२३ ते दिनांक ३१ डिसेंबर २०२५** या कालावधीत पीएच.डी करीता कायम नोंदणी असणाऱ्या अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी **दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत दुसरी मुदतवाढ** देण्यात येत आहे याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

स्वाक्षरी/--
(दिपा मुधोळ-मुंडे )
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन**
**व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.**